महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

जून - २००९
वर्ष ४- अंक ११

सृजन
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# संवाद

महानिर्मितीने ६ जून, २००९ रोजी पाचव्या वर्षात पदार्पण केले. आज मागे वळून चार वर्षांतील कामगिरी बघताना वेळोवेळी पार केलेले अनेक खाचखळगे-अडथळे दिसतात. त्या सर्वांना ओलांडून आपण इथवर आलो. पण यापुढील वाटचालीतही अशीच नवननवीन आव्हाने आपल्याला पेलावी लागणार आहेत. ही आव्हाने सक्षमपणे पेलण्यासाठी तुम्हा सर्वांचे मनोबल वाढवणे हेच खरे तर या मनोगताचे उद्दिष्ट्य आहे.

आपले नेहमीचे कार्यक्षेत्र व परिसरातील सामाजिक क्षेत्र यांचे पर्यावरणसंवर्धनासाठी निव्वळ महानिर्मितीचा कर्मचारी म्हणून नव्हे तर एक सुजाण नागरिक म्हणून प्रयत्नशील राहणे, हे आपले कर्तव्यच आहे. नुकत्याच ५ जून, २००९ रोजी साजरा झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आपली ही वचनबद्धता अधिकाधिक दृढ व्हायला हवी. महानिर्मितीचे बहुतांशी कर्मचारी हे कंपनीच्या वसाहतींमध्येच वास्तव्य करतात. या वसाहती विद्युतकेंद्राच्या परिसरातच असतात. आपल्या विद्युतकेंद्रातील पर्यावरण आपण नीट राखले नाही तर त्याचा त्रास जसा परिसरातील सर्वसामान्य जनतेला होईल तसाच त्याही आधी वसाहतवासियांनाच होईल. शेवटी आपण सर्वजण व्यापक अर्थाने एकाच समाजाचे घटक आहोत. आपल्या विद्युतकेंद्रातून कोणतेही प्रदूषण होऊ नये, यासाठी सर्वतोपरी उपाययोजना आपण राबवत असतोच. परंतु, प्रदूषणनियंत्रणाची प्रक्रिया अखंडपणे काटेकोरपणे बजावली गेली पाहिजे, यात दुमत नसावे. अखंड वीजनिर्मिती हे आपले सर्वोच्च प्राधान्य असते. विद्युतकेंद्रात दैनंदिन काम करताना आपल्या कर्मचाऱ्याला प्रसंगी विपरीत परिस्थितीत म्हणजे उदा. उच्च तापमान, यंत्राचे अथक आवाज, धूळ-धूराचा संसर्ग अशा प्रतिकुल वातावरणाशी सामना करत प्रसंगी जीव धोक्यात घालून कर्तव्य बजावावे लागते. सर्वसामान्य वीजग्राहकाला मात्र आपण कोणत्या परिस्थितीत काम करतो, याविषयी फारशी माहिती असणे संभवत नसते. कंपनीचे हित जपत असताना स्वत:च्या आरोग्याला अपायकारक ठरणार नाही, अशा पर्यावरणाची स्थिती परिसरात राखणे आवश्यक आहे.


श्री. सुब्रत रथो
(व्यवस्थापकीय संचालक)

हा अंक तुमच्या हातात पडेपर्यंत पावसाळा सुरु झाला असेल. यापूर्वीच मी ओल्या कोळशाच्या समस्या-कोळशाचा साठा - आपत्ती व्यवस्थापन याविषयी आपणाशी हितगुज केलेले आहेच. विद्युतकेंद्रात कोठेही पाणी तुंबणार नाही, केबल ट्रेन्चमध्ये पाणी साठणार नाही, यासाठीची सर्व दक्षता क्षेत्रीय पातळीवर घ्यायची आहे. उंचीवरील कामे करताना पाय घसरणार नाही, यासाठी विशेष काळजी घ्यायची आहे. मुख्यालयात नुकत्याच संपन्न झालेल्या मासिक आढावा बैठकीत सर्व क्षेत्रीय केंद्रप्रमुखांनी आपापल्या वीजकेंद्रातील कोळसा हाताळणी विभागाविषयी सादरीकरण केले होते. त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्याप्रमाणे तातडीच्या सूचना मी सर्व संबंधितांना दिल्या आहेत. पावसाळ्यात विजेची मागणी तुलनेने थोडी कमी असली तरीही ओल्या कोळशाच्या समस्येमुळे वीजउत्पादनातही अडथळे येत असतात. चंद्रपूर - कोराडी - खापरखेडा येथील वीजनिर्मिती केंद्राची पाहणी करताना मी कोळसा हाताळणी विभागांना आवर्जून भेट दिली. कोळशाची धूळ डस्ट कलेक्टरच्या माध्यमातून गोळा केल्यास सुरक्षिततेबरोबर तेथील पर्यावरण राखण्यासदेखील उपयोग होईल, हे निश्चित. यासंदर्भात क्षेत्रीय कार्यालयांनी तातडीने कार्यवाही करावी, असे मी सर्व केंद्रप्रमुखांना सांगितले आहे.

आपले प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे निघाले आहेत, याची प्रचिती आता वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनतेलाही येत आहे. या प्रकल्प उभारणीच्या सर्व कामांचा दर्जा हा अत्युच्च असलाच पाहिजे, त्यात कोणतीही तडजोड नको, हे मी वारंवार सूचित करतोय. आपले जुने निर्मितीसंच बंद पडणे वीजग्राहक समजू शकतात; परंतु, नव्या निर्मितीसंचाकडून मात्र अखंड विनाव्यत्यय वीजनिर्मितीचीच अपेक्षा असणार आहे. आपण प्रकल्पांचे काम टर्न-की तत्वावर दिलेले असले तरीही या कामाच्या दर्जावर आपले निरीक्षण व नियंत्रण हवे. एखाद्या कामाचा दर्जा अपेक्षेनुरूप नसल्यास तातडीने ते संबंधितांच्या लक्षात आणून देणे, हे क्षेत्रीय अभियंत्यांचे काम आहे. आपले स्वत:चे घर बांधताना ज्याप्रमाणे आपण बिल्डरच्या कामाकडे - सामुग्रीच्या दर्जाकडे काटेकोर लक्ष ठेवतो, त्याचप्रमाणे आपले महानिर्मितीचे वीजकेंद्र उभारले जात असताना आपण दक्ष राहायला हवे. नंतर किमान पंचवीस वर्षे सेवा या नवीन संचाद्वारे महानिर्मितीला मिळायला हवी, यासाठी क्षेत्रीय उभारणीच्या कामात प्रकल्प अभियंत्यांनी योग्य देखरेख करून सहयोग द्यावा.

महानिर्मितीचे व्यवस्थापन व कर्मचारी यांतील संबंध अधिकाधिक सौहार्दपूर्ण व्हावेत तसेच परिपूर्ण आंतर-संप्रेषणाच्या माध्यमातून कंपनीचा विकास साध्य व्हावा असे मला मनापासून वाटते. महानिर्मितीच्या चतुर्थ वर्धापनदिनानिमित्ताने आयोजित केलेल्या विविध स्पर्धा - उपक्रमांच्या स्वरूपावरून आपणा सर्वांना त्याची कल्पना आली असेलच. सकारात्मक विचारांची मुक्त देवाण - घेवाण अशा उपक्रमांतून साध्य व्हावी आणि एक आदर्श कार्यसंस्कृती वृद्धिंगत व्हावी, असे मनोमन वाटते.

कंपनीचे कर्मचारी - अधिकारी यांना त्यांच्या तांत्रिकी क्षेत्रातील विचारांचे खुले दालन प्राप्त व्हावे - ऊर्जाक्षेत्रातील ताज्या घडामोडीविषयी अभिव्यक्त होण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, नवनवीन संकल्पनांच्या उदयातून नव्या उर्मीने तांत्रिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी अभियंत्यांनी उद्युक्त व्हावे, या अशा अनेक उद्देशाने आपण येत्या काही दिवसांत महानिर्मितीचे नवीन "E-magazine" तसेच ''फोरम'' सुरू करत आहोत या नव्या संगणकीय माध्यमातून ज्ञानाचे हस्तांतरण शक्य व्हावे, या दृष्टिकोनातून हा अभिनव प्रयोग ''सृजन'' च्या जोडीला सुरू करत आहोत. ऊर्जाक्षेत्रातील तज्ञांचे मौलिक मार्गदर्शन भविष्यात या ''फोरम'' च्या माध्यमातून प्राप्त होऊ शकेल. प्रारंभी प्रायोगिक तत्वावर कंपनीच्या अभियंत्यांकरिता हा उपक्रम राबविला जाईल. अभियंत्यांकडून सकारात्मक प्रतिसाद लाभल्यास या उपक्रमाचा आवाका निश्चितच वाढवता येईल. आपले ज्ञान दुसऱ्याला दिल्याने नव्याने परिपूर्ण होत जात असते. ज्ञानाची ही देवाण-घेवाण सध्याच्या इंटरनेटच्या जमान्यात अत्यंत आवश्यक अशी गरज बनलेली आहे.महानिर्मितीने अद्ययावत तंत्रज्ञानाची कास धरलेली असल्याने आपल्याला हे उपक्रम यशस्वी करावे लागणारच आहेत, आपल्या सर्वांच्या सहकार्याने असे उपक्रम यशस्वी होतील, याची खात्रीदेखील आहे.

सुब्रत रथो
(व्यवस्थापकीय संचालक)